क्रमांक : १८३८५ /ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : 0 2 DEC 2021

:: परिपत्रक ::

विषय :- महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२१ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरीता नेमून देण्यात आलेल्या दिनांकाबाबतचे सुधारित विवरणपत्र..

संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १६७५९/ब, दिनांक २ नोव्हेंबर, २०२१

विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या सोमवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१ रोजीपासून सुरु होणारे आगामी तृतीय (हिवाळी) अधिवेशन आता बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी पासून विधानभवन, मुंबई येथे सुरु होणार आहे. त्यानुसार बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ ते मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तरांबाबतची माहिती दर्शविणारे सुधारित विवरणपत्र (सोबत जोडल्याप्रमाणे) आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाही पाठविण्यात येत आहे.

विवरणपत्र स्तंभ क्रमांक ६ मध्ये प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक दर्शविण्यात आलेला आहे. **उक्त दिनांकानंतर प्रश्न हस्तांतरणाची प्रकरणे या सचिवालयास प्राप्त झाल्यास तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक / गट बदलून देता येणे शक्य होणार नाही. अशा स्थितीत त्या प्रश्नांच्या उत्तरासाठी नेमून दिलेल्या दिनांकास उत्तर प्राप्त होणे आवश्यक राहील, तसेच संबंधित मा.मंत्री महोदयांना सदर तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या उत्तराकरीता निश्चित केलेल्या मूळ दिवशीच सभागृहात उपस्थित राहून अनुपूरक प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतील.**

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता तारांकित प्रश्न अन्य विभागाकडे हस्तांतरीत होत असल्यास विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत सदर प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाची QIS या संगणक प्रणालीद्वारे कार्यवाही पूर्ण करावी व हस्तांतरणाबाबत विधानसभा प्रश्न कक्षाच्या b1.qust.mls@gmail.com या ई-मेलवर तथा विधानसभा प्रश्न कक्षास तातडीने पत्राद्वारे या सचिवालयास अवगत करण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांनी दक्षता घ्यावी.

(विलास आठवले)
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,
(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
(२) मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
(३) मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (तीन प्रती)
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई (प्रत्येकी तीन प्रती)
यांना माहितीसाठी तथा कार्यवाही अग्रेषित

# महाराष्ट्र विधानसभा

# तृतीय (हिवाळी) अधिवेशन, २०२१

## तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक, विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक तसेच प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक इत्यादी माहिती दर्शविणारे सुधारित विवरणपत्र

| गट क्र. | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री | उत्तराचा पुर्वीचा वार व दिनांक | उत्तराचा सुधारित वार व दिनांक | विभागाकडून उत्तर येण्याचा वार व दिनांक | प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा वार व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| एक | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(४) ग्रामविकास व कामगार मंत्री<br>(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(६) महिला व बालविकास मंत्री<br>(७) मृद व जलसंधारण मंत्री | सोमवार, १३ डिसेंबर, २०२१ | सोमवार, २७ डिसेंबर, २०२१ | सोमवार, २० डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, १७ डिसेंबर, २०२१ |
| दोन | (१) मुख्यमंत्री<br>(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(३) गृहनिर्माण मंत्री<br>(४) नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | मंगळवार, ७ डिसेंबर, २०२१ | मंगळवार, २८ डिसेंबर, २०२१ | मंगळवार, २१ डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, १७ डिसेंबर, २०२१ |
| तीन | (१) गृह मंत्री<br>(२) महसूल मंत्री<br>(३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(४) कृषी, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री<br>(५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री<br>(६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | बुधवार, ८ डिसेंबर, २०२१ | बुधवार, २२ डिसेंबर, २०२१ | बुधवार, १५ डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, १० डिसेंबर, २०२१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| चार | (१) अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>(३) अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री<br>(४) शालेय शिक्षण मंत्री<br>(५) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री<br>(६) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(७) परिवहन, संसदीय कार्य मंत्री<br>(८) पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल राजशिष्टाचार मंत्री | गुरुवार, ९ डिसेबर, २०२१ | गुरुवार, २३ डिसेंबर, २०२१ | गुरुवार, १६ डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, १० डिसेंबर, २०२१ |
| पाच | (१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री<br>(२) उर्जा मंत्री<br>(३) इतर मागास बहुजन कल्याण,खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री<br>(४) आदिवासी विकास मंत्री<br>(५) सहकार, पणन मंत्री<br>(६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री | शुक्रवार, १० डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, २४ डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, १७ डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, १० डिसेंबर, २०२१ |